कृष्णा एक्सप्रेस

www.krishnaexpress.in
12 Jul 2026 - Page 3

# पाटकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची 'सायबर वॉरियर्स' म्हणून निवड

## क्विक हील फाऊंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' मोहिमेत विद्यार्थ्यांचा सहभाग




मुंबई : वाढत्या डिजिटल फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक करण्यासाठी क्विक हील फाऊंडेशनच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या मोहिमेत पाटकर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची 'सायबर वॉरियर्स' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

पुणे येथील विमान नगरमधील सॉलिटेअर बिझनेस हब येथे असलेल्या क्विक हील फाऊंडेशनच्या कार्यालयात ३ जुलै २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले होते. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना सायबर गुन्ह्यांचे प्रकार, वैयक्तिक माहितीचे संरक्षण, डिजिटल व्यवहारातील सुरक्षितता तसेच नागरिकांमध्ये सायबर जागरूकता निर्माण करण्यासाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले.

'माझा डेटा, माझी जबाबदारी' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात नागरिकांनी स्वतःचा वैयक्तिक डेटा सुरक्षित ठेवण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करून त्यांना समाजाच्या विविध स्तरांपर्यंत पोहोचून सायबर सुरक्षेचा संदेश देण्यासाठी सज्ज केले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर तसेच व्यवस्थापक अजय शिर्के उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले.

या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पाटकर कॉलेजमध्ये स्वतंत्र विद्यार्थी कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली आहे. शिक्षिका समन्वयक निकिता मडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली ही समिती कार्यरत राहणार आहे. या समितीमध्ये क्लब अध्यक्ष म्हणून अंश गिरप, सचिव म्हणून साई भुताळे, उपक्रम संचालक म्हणून रुक्सार सय्यद आणि माध्यम संचालक म्हणून आश्विक पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांनी माहिती-तंत्रज्ञान विभागाचे सहसमन्वयक चयन भट्टाचार्जी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण पूर्ण केले. समाजातील नागरिकांना सायबर फसवणुकीपासून संरक्षण मिळावे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांची सवय लागावी, यासाठी हे विद्यार्थी विविध जनजागृती उपक्रम राबविणार आहेत. पाटकर वर्दे कॉलेजच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) डॉ. माला खरकर यांनी निवड झालेल्या विद्यार्थी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. सामाजिक जबाबदारी स्वीकारून सायबर सुरक्षेच्या क्षेत्रात योगदान देण्याची विद्यार्थ्यांना मिळालेली संधी ही महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.